वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ / घट करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२२/प्र.क्र.१६५/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १२ ऑक्टोबर, २०२२.

वाचा :- संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/ वास्तुशास्त्र/मान्यता/२०२२/८९७, दि.२३.०९.२०२२.

**प्रस्तावना :**

वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन तसेच संचालक, तंत्रशिक्षण यांनी उपरोक्त नमूद दि.२३.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून "प्रपत्र-अ" मध्ये नमूद संस्थेतील वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढविण्यास "प्रपत्र-ब" मध्ये नमूद संस्थेतील अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये घट करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सोबतच्या "प्रपत्र-अ" मध्ये नमूद केलेल्या संस्थेतील वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ करण्यास व "प्रपत्र-ब" मध्ये नमूद संस्थेतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये घट करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर मान्यता कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२) प्रस्तुत बाबतीत वास्तुकला परिषदेने विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.
३) शासनाने विहित केलेल्या तसेच वास्तुकला परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके वास्तुकला परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आ तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२१०१२१३१२३०७००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by NITIN JYOTINATH GHIRATKAR
Date: 2022.10.12 17:09:01 +05'30'

**( नि. ज्यो. घिरटकर )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४) प्राचार्य, संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) कौंसिल ऑफ आर्किटेक्चर, इंडिया हॅबीटॅट सेंटर, कोअर-६ ए, १ ला मजला, लोधी रोड, नवी दिल्ली-११० ००३.
६) सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
७) निवड नस्ती/तांशि-४.

## प्रपत्र - अ

### शासन निर्णय क्र.मान्यता-२०२२/प्र.क्र.१६५/तांशि-४, दि.१२ ऑक्टोबर, २०२२.

| अ.क्र. | संस्थेचा डिटीई संकेतांक, नाव व पत्ता | अभ्यासक्रमाचे नाव | शै.व.२०२१-२२ ची प्रवेश क्षमता | शै.व.२०२२-२३ करीताची प्रवेश क्षमता | प्रवेश क्षमतेत बदल |
|---|---|---|---|---|---|
| १. | ५४४५ - एमईटीचे स्कूल ऑफ आर्किटेक्चर ॲन्ड इंटिरिअर डिझाईन, गोवर्धन, जि.नाशिक - ४२२ २२२ | बी.आर्च. | ४० | ८० | ४० |

**प्रपत्र - ब**

**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२२/प्र.क्र.१६५/तांशि-४, दि.१२ ऑक्टोबर, २०२२.**

| अ.क्र. | संस्थेचा डिटीई संकेतांक, नाव व पत्ता | अभ्यासक्रमाचे नाव | शै.व.२०२१-२२ ची प्रवेश क्षमता | शै.व.२०२२-२३ करीताची प्रवेश क्षमता | प्रवेश क्षमतेत बदल |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३०१८- रचना संसदचे ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर, २७८, शंकर घाणेकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ | बी.आर्च. | ४० (विना-अनुदानित) | २० | -२० |